# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

निवडणूक विभाग
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
दूरध्वनी क्र. : २५६०११०८
फॅक्स क्र. : ०२०-२५६९२०३१
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

Election Section
Ganeshkhind, Pune 411 007
Phone No.: 25601108
Email Id.: election@pun.unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र. : साफुपुविनि/१२५

दिनांक : १४ सप्टेंबर, २०१७

प्रति,

१) मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.
२) मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.
३) मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय : विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्याच्यादृष्टीने ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करणेबाबत.**

महोदय/ महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर सन २०१० मध्ये झालेल्या निवडणुकांमधून निवडून आलेल्या / स्वीकृत करण्यात आलेल्या / नामनिर्देशित करण्यात आलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांची मुदत महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम ४२(१) मधील तरतुदीनुसार दि. ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपुष्टात आली होती. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ४२(२) नुसार दि. ३१ ऑगस्ट, २०१५ पूर्वी तीन महिने अगोदर प्रत्यक्ष निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती.

परंतु, संदर्भ पत्र क्र.साफुपुविनि/२६३, दि. २८ सप्टेंबर, २०१५ अन्वये विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाच्या निवडणूका पुढे ढकलण्यात आल्याचे सर्व संबंधितांना कळविण्यात आले होते.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने, महाराष्ट्र शासन राजपत्र, दि. २३ फेब्रुवारी, २०१७ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, दि. ०१ मार्च, २०१७ पासून अधिनियमित केलेला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ६२(१) नुसार विविध प्राधिकरणांच्या सदस्यांचा पदावधी हा ०१ सप्टेंबर पासून सुरु होईल तसेच कलम ६२(२) नुसार विविध प्राधिकरणांच्या निवडणूका मुदत संपल्याच्या तीन महिने अगोदर निवडणूक नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया सुरु करण्यात येईल व ती त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबरच्या आत पूर्ण करण्यात येईल.

त्यामुळे विविध अधिकार मंडळाच्या मतदार याद्या तयार करण्याचे काम सुरु झाले आहे. विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(ण)[28(2)(o)] अन्वये प्राचार्य, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, ३२(३)(छ)[32(3)(g)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये विद्यापीठ अध्यापक व ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये महाविद्यालयीन / परिसंस्थांतील विभागप्रमुख यांनी ऑनलाईन पध्दतीने मतदार याद्या तयार करण्यासाठी अर्ज भरावयाचा आहे.

ऑनलाईन अर्ज करतांना अर्जाबरोबर खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे :

१) **प्राचार्य** - प्राचार्य म्हणून मिळालेल्या विद्यापीठ मान्यता पत्राची (Approval Letter) स्व-साक्षांकित प्रत*

२) **महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक** - पूर्ण वेळ अध्यापक पदावरील नियुक्तीस विद्यापीठाने दिलेल्या मान्यता पत्राची (Approval Letter) स्व-साक्षांकित प्रत*

३) **महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख** - महाविद्यालय/परिसंस्थांतील विद्यापीठ मान्यताप्राप्त पूर्ण वेळ अध्यापकच फक्त अभ्यासमंडळाच्या निवडणुकीसाठी पात्र असतील, तसेच एक अध्यापक फक्त कोणत्याही एकाच विषयासाठी महाविद्यालयीन/परिसंस्थेतील विभागप्रमुख म्हणून नाव पाठविण्यास् पात्र राहील. विभागप्रमुख म्हणून नाव पाठविताना खालील कागदपत्रे जोडावीत :

अ) विभागप्रमुख म्हणून नेमणुकीचे प्राचार्याचे/संचालकांचे स्व-साक्षांकित प्रमाणपत्र. प्राचार्य/संचालक हे विभागप्रमुख असल्यास संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे त्यासंबंधीचे स्व-साक्षांकित प्रमाणपत्र.

ब) संबंधित विषय महाविद्यालय/परिसंस्थेत शिकविण्यास महाराष्ट्र शासनाच्या मंजुरी पत्राची स्व-साक्षांकित प्रत.

क) संबंधित विषय महाविद्यालय/परिसंस्थेत शिकविण्यास विद्यापीठाच्या संलग्निकरण/मान्यता पत्राची स्व-साक्षांकित प्रत.

४) **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागात कार्यरत असलेले अध्यापक** - विद्यापीठाने दिलेल्या पूर्ण वेळ अध्यापक पदावरील नेमणूक आदेशाची स्व-साक्षांकित प्रत.

**<u>ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया :-</u>**

सर्व संबंधितांनी **BCUD Online** च्या टीचर अकाउंट मधून ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाचा आहे. ज्या महाविद्यालय/परिसंस्थेतील अध्यापकांनी अकाउंट तयार केले नसेल त्यांनी आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेच्या **BCUD Online College Account** मधून असे अकाऊंट तयार करुन घ्यावे. विद्यापीठातील शैक्षणिक विभागात कार्यरत असणा-या अध्यापकांनी **BCUD Online Department Account** मधून असे अकाऊंट तयार करुन घ्यावे. हे टिचर अकाऊंट त्या-त्या अध्यापकाच्या टिचर प्रोफाईलशी निगडीत आहे.

**<u>भाग १ - टिचर्स प्रोफाईल अंतर्गतची प्रक्रिया :-</u>**

या टिचर प्रोफाईल मध्ये मागविलेल्या माहितीपैकी Personal Details, Approval History, Experience as HOD (जर आपणास महाविद्यालयीन/परिसंस्थेतील विभागप्रमुख या अंतर्गत नोंदणी करावयाची असेल तर) या सदरात आपली माहिती भरलेली असणे आवश्यक आहे.

Approval History या सदरात महाविद्यालय/परिसंस्थेतील अध्यापकांनी आपले चालू असलेल्या मान्यता पत्राची (उदा. प्राचार्य, अध्यापक) अचूक माहिती भरुन, त्याची स्कॅन केलेली PDF फाईल ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. या सदरात असे मान्यता पत्र अपलोड केलेले नसल्यास अध्यापकास मतदार नोंदणीसाठी अर्ज करता येणार नाही.

**विद्यापीठ शैक्षणिक विभागात** पूर्ण वेळ कार्यरत असणा-या अध्यापकांनी याच सदरात आपल्या सध्याच्या नेमणूक पत्राची माहिती भरून त्याची स्कॅन प्रत ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.

ज्या अध्यापकांनी यापूर्वीच त्यांच्या टिचर प्रोफाईलला असे पत्र अपलोड केलेले असेल, त्या समोर विद्यापीठाकडून पत्राची तपासणी होवून, जर ते योग्य असेल तर University Approved असे दर्शविले जाते.

**महाविद्यालयीन/परिसंस्थेतील विभाग प्रमुख** म्हणून नोंदणी करण्यासाठी Experience as HOD या सदरात आपली माहिती भरुन वर नमूद केलेले सर्व कागदपत्रे एकत्रित स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.

**भाग २ - मतदार नोंदणीचा अर्ज करण्याची प्रक्रिया :-**

**BCUD Online (http://bcud.unipune.ac.in)** या लिंकवर अध्यापकांनी लॉगिन केल्यानंतर Registration for Election 2017 या लिंकवर क्लिक करुन मतदार नोंदणीचा अर्ज भरावयाचा आहे. हा अर्ज भरतांना भाग-१ मध्ये अपलोड केलेली कागदपत्रे आपणास दाखविली जातात. त्यांस अनुसरुन ऑनलाईन अर्ज पूर्ण करावयाचा आहे. अर्ज पूर्ण केल्यानंतर तेथे दाखविलेल्या अर्जाची प्रिंट आऊट घ्यावयाची आहे. या प्रिंट आऊटमध्ये आपण अपलोड केलेली कागदपत्रे सोबतच प्रिंट होऊन येतील. ज्यांच्या मान्यता पत्रांच्या माहितीसमोर ***भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे University Approved असे दर्शविलेले आहे त्यांनी काढलेल्या प्रिंट आऊट मध्ये या कागदपत्रांचा समावेश नसेल व त्यांनी ती पुन्हा स्वतंत्र जोडण्याची गरज नाही.** मात्र University Approved असे दर्शविलेले नसेल त्यांनी प्रिंट आऊट सोबत मान्यता पत्रे स्व-साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे.

आपली माहिती वर नमूद केलेल्या पध्दतीनुसार **शुक्रवार, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ ते शुक्रवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०१७** रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत या दरम्यान संकेतस्थळावर **(http://bcud.unipune.ac.in)** भरावयाची आहे. संकेतस्थळावर नोंदविलेली माहिती त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे स्व-साक्षांकित केलेल्या आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी **शुक्रवार, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१७** रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या निवडणूक विभागास खास दुतामार्फत पाठवावयाची आहेत. या तारखेनंतर माहिती प्राप्त झाल्यास, माहिती अपूर्ण असल्यास किंवा आवश्यक त्या कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची पूर्तता केलेली नसल्यास अशा नावाचा संबंधित मतदार यादीत समावेश केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

याबाबत काही शंका / अडचणी असल्यास **teacher-techsupport@pun.unipune.ac.in** या e-mail id वर संपर्क साधावा.

आपणास विनंती करण्यात येते की, सर्व संबंधित अध्यापकांनी संकेत स्थळामार्फत माहिती भरुन संकेत स्थळावरील प्रपत्रामध्ये त्यावर नमूद केलेल्या संबंधिताच्या स्वाक्षरीसह व या परिपत्रकामध्ये नमूद केलेली कागदपत्रे स्व-साक्षांकित करुन तसेच आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह निवडणूकीच्या कामासाठी खास दुतामार्फत पाठविण्याची व्यवस्था करावी.

विद्यापीठ विभागातील / महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील जे प्राचार्य / संचालक / अध्यापक / विद्यापीठ अध्यापक मतदार नोंदणीच्या कालावधीत धारणाधिकार ठेऊन इतरत्र कार्यरत असतील परंतु प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी अथवा त्याआधि ते त्यांच्या मूळ पदावर रुजू होणार असतील, त्यांना मतदार नोंदणी करण्याची परवानगी आहे. परंतु संबंधित निवडणूकीचे प्रकटन (निवडणूक सूचना) प्रसिध्दीच्या दिनांकास अथवा त्याआधि ते मूळ पदावर रुजू झाले आहेत याचा पुरावा त्यांनी सादर करणे आवश्यक राहील. याउलट विद्यापीठ विभागातील / महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील जे प्राचार्य / संचालक / अध्यापक / विद्यापीठ अध्यापक मतदार नोंदणीच्या कालावधीपर्यंत मूळ पदावर कार्यरत असतील, परंतु संबंधित निवडणूकीचे प्रकटन (निवडणूक सूचना) प्रसिध्दीच्या दिनांकास ते धारणाधिकार ठेऊन इतरत्र कार्यरत असतील अशा मतदारांना निवडणूक लढविता येणार नाही व मतदानही करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सबब, मा. विभागप्रमुख विद्यापीठ विभाग / मा. प्राचार्य / मा. संचालक यांनी सदरच्या परिपत्रकाचा आशय आपल्या विभागातील / महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त परिसंस्थातील सर्व सबंधित अध्यापकांच्या निदर्शनास आणून द्यावा आणि सर्व अध्यापकांची एकत्रित माहिती एकाच वेळी विद्यापीठाच्या निवडणूक विभागास विहित तारखेपूर्वी खास दुतामार्फत पाठवावी, ही विनंती. तसेच सोबतच्या विहित नमुन्यामध्ये आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील / विद्यापीठ विभागातील कोणत्याही पूर्णवेळ मान्यताप्राप्त अध्यापकांचे, विहित मुदतीत मतदार नोंदणीसाठी भरलेले अर्ज विद्यापीठाकडे सादर करावयाचे शिल्लक राहिलेले नाहीत, असे हमीपत्र अर्ज सादर करताना निवडणूक विभागास सादर करणे आवश्यक आहे.

**या संदर्भात असेही कळविण्यात येते की, एकदा मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर वरील मुदतीनंतर नव्याने नावे कळविल्यास अशा नावांचा समावेश मतदार यादीत केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला,

१५/९/१७

**(डॉ. अरविंद दि. शाळिग्राम)**
प्रभारी कुलसचिव

D:\Election 2017\Teachers, PG Teachers, Principal\Circular.docx#

## हमीपत्राचा नमुना :

प्रति,
मा. कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे - ४११००७.

**विषय** : अध्यापकांच्या मतदार नोंदणी अर्जाबाबत.

**संदर्भ** : विद्यापीठाचे पत्र क्र. साफुपुविनि/ दि. १४ सप्टेंबर, २०१७.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, आमच्या ............................................... या महाविद्यालय/परिसंस्था/विद्यापीठ विभागातील सर्व पूर्णवेळ मान्यताप्राप्त अध्यापकांची ऑनलाईन पध्दतीने मतदार नोंदणी पूर्ण झाली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जांची संख्या** | **विद्यापीठाकडे सादर केलेल्या अर्जांची संख्या** | **शेरा** |
|---|---|---|---|
| | | | |

वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे खरी व अचूक आहे. तसेच महाविद्यालय/परिसंस्था/विद्यापीठ विभागाकडे वर नमूद केलेल्या अर्जाव्यतिरिक्त आज रोजी अध्यापकांच्या मतदार नोंदणीचे कोणतेही अर्ज विद्यापीठाकडे सादर करावयाचे राहिलेले नाहीत.

कळावे,

आपला/आपली,

प्राचार्य/संचालक/विद्यापीठ विभागप्रमुख

सही : .....................

स्थळ : ...........

नांव : .......................

दिनांक :

शिक्का : ..................

D:\Election 2017\Teachers, PG Teachers, Principal\Circular.docx#